## स्पर्धांचे निकाल

**दहाव्या राज्यस्तरीय आंतर-शालेय निबंध स्पर्धेचा निर्णय:**

यंदा ३१ जुलैपर्यंत महाराष्ट्रातील १२ शाळांमधून १२८ विद्यार्थी/विद्यार्थिनींनी निबंध पाठवून स्पर्धेत भाग घेतला. घोषित केल्याप्रमाणे १५ ऑगस्ट २०१५ रोजी स्पर्धेचा निर्णय जाहीर झाला. तो खालील प्रमाणे -

१. प्रथम पुरस्कार *(विभागून)* -

कु. सायली मिरासदार *(सांगली)*

कु. गायत्री पांडुळे *(अहमदनगर)*

२. द्वितीय पुरस्कार - कु. वसुंधरा धस *(पुणे)*

३. तृतीय पुरस्कार - कु. प्रशिक राक्षे *(पुणे)*

४. उत्तेजनार्थ पुरस्कार - (अ) कु. प्रसन्न कुलकर्णी *(पुणे)*

- (ब) कु. साक्षी शिंदे *(सातारा)*

**अकरावी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा :**

स्वामी चिदानंद जन्म शताब्दी निमित्त आयोजित केलेल्या यंदाच्या वक्तृत्वस्पर्धेचे महत्त्व काही वेगळेच होते. डॉ. मेधा सिधयेंसारख्या काटेकोर परीक्षक यावेळी मिळालेल्या होत्या. स्पर्धेत एकूण १७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. स्पर्धेचा निर्णय खालील प्रमाणे -

१. प्रथम पुरस्कार - कु. चेतना पवार, सी.ओ.ई.पी.

२. द्वितीय पुरस्कार - कु. हृषीकेश पाखले, सी.ओ.ई.पी.

३. तृतीय पुरस्कार -

कु. नम्रता जहागिरदार, स. प. महाविद्यालय.

उत्तेजनार्थ - (अ) कु. श्वेता पाटील, फर्ग्युसन महाविद्यालय.

- (ब) कु. मयुरेश शेंदुर्णीकर स. प. महाविद्यालय.

विशेष पुरस्कारासाठी असलेल्या विषयावर एकाही स्पर्धकाने भाषण न केल्याने या पुरस्काराचा मानकरी यंदा कोणीही नाही. ही स्पर्धा सप्टेंबर १२, २०१५ रोजी भारत इतिहास संशोधक मंडळात संपन्न झाली.



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- 'दिव्य जीवन' या मासिक पत्रिकेचा अंक परिवारातील सदस्यांना वितरीत करण्यात आला.
- ऑगस्ट महिन्याचा सत्संग डॉ. आनंद राव यांच्या घरी दि. २ रोजी संपन्न झाला.

शाखेच्या खालील सदस्यांनी ऑगस्ट महिन्यात देणगी दिली -

१. श्री. मूर्ती : रु.२०००/-

२. श्री. एम्. एस. जोशी : रु. १००/-


**❀ पुणे शाखेचा पत्ता ❀**

**श्री. गो. आ. नगरकर**
'स्वानंद' एस्. २०
सहजीवन सोसायटी
पर्वती, पुणे ४११००९
☎ ९३७०५७०२०६

**श्री. नितीन देशपांडे**
'ईशावास्य'
प्लॉट नं. ४९ /सायंतारा,
डी. एस. के. विश्व
धायरी, पुणे ४११०४१
☎ ०९८५०९३१४१७
०९८५०८२६९९०


पुस्त डाक

प्रति

____________________

____________________

____________________

____________________



# दिव्य जीवन



स्वामी शिवानंद सरस्वती



स्वामी चिदानंद सरस्वती


(दिव्य जीवन संघ, पुणे शाखा)
(ज्ञानयज्ञ म्हणून वितरित)
वर्ष १० । अंक ९
सप्टेंबर २०१५


ऑगस्ट २०१५ मध्ये पार पडलेल्या दहाव्या राज्यस्तरीय आंतरशालेय निबंध स्पर्धेचा आणि सप्टेंबर २०१५ मध्ये पार पडलेल्या अकराव्या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचा वृत्तांत या अंकात देण्यात आलेला आहे. सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे आभार आणि विजेत्यांचे अभिनंदन ! हा प्रतिसाद असाच वाढता राहू दे हीच प्रार्थना.

सर्व शालाप्रमुखांचे आणि प्राचार्यांचे या निमित्ताने आभार. सर्व सहभागी शाळा, महाविद्यालयांना तसेच विजेत्यांना हा अंक पाठविण्यात येत आहे.

सप्टेंबर महिना, दिव्य जीवन परिवारात अत्यंत महत्त्वाचा ! ८ सप्टेंबर रोजी स्वामी शिवानंद सरस्वती यांचा जन्म झाला. तर २४ सप्टेंबर ही स्वामी चिदानंद सरस्वती यांची जयंती !

उभयतांचे आशिर्वाद असेच आपणा सर्वांवर राहोत.

# महिन्याचा विचार

**८ सप्टेंबर १९६०**

आज हिमाचलके आँचलसे शीत पवन आया।
गुरुजीके शुभ जन्म दिवस का ले संदेश नया॥
आज भीत है जनमन सारा युद्धोंके भयसे।
क्रूर शक्तियाँ अट्टहास कर रही क्षणिक जयसे।
मंगलमय वे भाव सुकोमल भूल रही दुनिया॥१॥
जीवन का सर्वस्व मनाया जाता भोगोंमें।
परिवर्तन हो रहा उसीका भीषण रोगोंमे।
विज्ञानी निर्माण कर रहे सहारास्त्र नया॥२॥
जनमन को कुछ स्वास्थ्य दिलाने, सोहृद सिखलाने।
शिवानंद का रूप लिया है आज स्वयं प्रभुने।
देश देशमें फैले उनकी बाणी पुण्यमया॥३॥
उमड रहे हैं भाव अपरिमित भक्तोंके मनके।
जुग जुग जीये शिवानंद जी स्वामी त्रिभुवनके।
लक्ष्य जिन्होंने मानव जीवन का है प्रकट किया॥४॥
हरि ॐ तत् सत्॥

सौ. चारूशीला भ. नाईक, सांगली.

**२४ सप्टेंबर**

## परंधाम

हे ते परब्रह्माचे अधिष्ठान आहे. ते आधाराविना आहे. इथ दिवस नाही नि रात्रही नाही. गुण नाही नि अवगुण नाही. प्रकाश नाही आणि अंधारही नाही. सूर्योदय नाही तसा चंद्रोदयही नाही. मृत्यु नाही, क्षुधा नाही, तृषा नाही नि रोगपीडा नाही. इथ कुणाला निद्रा नाही व जागृतीही नाही. हे अमरत्वाचे नगर आहे. निर्भयतेचे धाम आहे. अलौकिक आनंदाचे अधिष्ठान आहे. ब्रह्मनिर्वाण, परमगती म्हणतात ते हेच होय. 'ब्रह्माचे ध्यान करा व आत्म स्वरूपात निरंतर विसावा घ्या' असे स्वामी शिवानंद सांगतात.

**आनंद अंतर्यामी आहे.** कस्तुरी मृगाच्या नाभीत असते. पण तिचा गंध घेण्यासाठी तो इकडे तिकडे आणि सभोवती फिरतो. गळ्यातील साखळी शोधण्यासाठी नवयुवती अशीच इकडे तिकडे धावते. दहावा मनुष्य समोर असून मोजताना स्वतःला मोजण्याचे विसरल्यामुळे तो विनाकारण शोक करतो. ताजे लोणी जवळ असून तुम्ही तुपासाठी हिंडता. अस्सल रत्न जवळ असून फुटक्या काचा गोळा करण्याच्या मागे असता हे निरर्थकच नाही काय ? किल्ली खिशातच आहे पण तुम्ही इतरत्र शोधत आहांत. आनंदाचा सागर तुमच्या अंतरीच आहे पण तुम्ही व्यर्थ इतरत्र धडपडत आहांत. सूर्याचा सूर्य तुमच्या अंतरी तळपतो आहे पण तुमचे काम अंधदृष्टी तो पाहू शकत नाही. तुमच्या अंतर्यामी तो अनादि नाद होतो आहे पण तुमचे कान त्याबाबत जणु बहिरे झाले आहेत. 'अंतरात पहा. ध्यान करा आणि अखंड आत्मानंद अनुभवा.' असे स्वामी शिवानंद म्हणतात.

**दिव्य जीवन संघ, पुणे शाखा**

आपल्या शाखेचे कार्य कसे सर्वांपर्यंत पोहोचते आहे, हे अनुभवता आले खालील तीन प्रसंगांमधून -

१. निबंध स्पर्धेचा निर्णय आणि शाळेतील एका विद्यार्थ्याचे पारितोषिक घेऊन मी शिवाजीनगर, पुणे येथील मॉडर्न हायस्कूलमध्ये पोहोचलो. मुख्याध्यापिका भेटल्या. त्यांनी श्री. पाटील सरांना बोलावून त्यांचा माझ्याशी परिचय करून दिला. पाटील सरांनी ग्रंथालयात नेऊन विचारपूस केली. पूर्वी आपल्या निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळालेल्या विद्यार्थ्याचा फोटो आणि त्याचा निबंध, दिव्य जीवन संघाच्या निर्देशासह शाळेच्या नियतकालीकात छापून आलेला आहे तो अंक सरांनी मला दिला. तसेच सप्टेंबर २०१५ चा 'दिव्य जीवन' या मासिक पत्रिकेचा अंक आवर्जून मागितला - या अंकात निबंध स्पर्धेचा उल्लेख असणार म्हणून ! खूप छान वाटलं पाटील सरांना भेटून.

२. आपल्या शाखेचे एक सदस्य, मागील महिन्यात अचानक घरी आले. आपला अंक आवर्जून मिळत असल्याचे नमूद करून त्यांनी शाखेला देणगी दिली आणि परतले. हा एक विलक्षण अनुभव वाटला.

३. यंदाच्या वक्तृत्व स्पर्धेचे निमंत्रण काही कारणाने मिळाले नसल्याने, खूप स्पर्धकांनी आठवण ठेवून फोन केले. स्पर्धेची विचारणा केली व स्पर्धेसाठी नाव नोंदणी केली. यंदा प्रथमच ई-मेलवर बऱ्याचशा महाविद्यालयांनी/स्पर्धकांनी नांव नोंदणी केली. स्पर्धेनंतर मेलवर आलेला एक फिडबॅक -

Dear Sir,
I got the result of the competition. The members who participated in the competition told me that the competition was really nice and they learned as well as enjoyed a lot. I would also like to mention that the guidance given by Medha Madam (Judge of the competition) about how the speech should be, was very helpful. We will definitely try to implement those tips henceforth. All participants wanted to convey this message to you and Medha Madam. I thank you again for giving us the opportunity to express our thoughts.

**Shreyas Joglekar**
*Debate Secretary,*
*COEP Debate club.*